MHBU130027772025

| | |
|---|---|
| **दाखल दिनांक** | **: १४.११.२०२५** |
| **नोंदणी दिनांक** | **: १४.११.२०२५** |
| **निकाल दिनांक** | **: २०.०४.२०२६** |
| **कालावधी** | **: ५ महिने ६ दिवस** |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली, यांचे न्यायालयात.**

**(पीठासीन अधिकारी : आय.ए.वाय.ए. खान)**

**सं.फौजदारी खटला क्र. १७३२/२०२५**

**निशाणी क्रमांक ९०**

महाराष्ट्र शासन,
तर्फे : पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन बुलडाणा शहर,
ता. व जि. बुलडाणा. ..... **अभियोगपक्ष**

**– विरुध्द –**

१. राहुल सिध्दीविनायक बोंद्रे,
वय ४८, धंदा - राजकारण,
२. शाम मोतीराम उमाळकर,
वय ६८, धंदा - राजकारण,
३. हर्षवर्धन वसंतराव सपकाळ,
वय ५२, धंदा - राजकारण,
४. संजय भगवान राठोड,
वय ५२ वर्ष, धंदा - राजकारण,
५. लक्ष्मण जानुजी घुमरे,
वय ६८ वर्ष, धंदा - राजकारण,
६. प्रविण रविंद्र सुरडकर,
वय ४२ वर्ष, धंदा - राजकारण,

७. शे. अमीन शे. बिराम,
वय ५६ वर्ष, धंदा - राजकारण,

८. बंडू सुरेश काळवाघे,
वय ३९ वर्ष, धंदा - राजकारण,

९. रवि प्रल्हादराव पाटील,
वय ४९ वर्ष, धंदा - राजकारण,

१०. दत्ता शंकर काकस,
वय ४८ वर्ष, धंदा - राजकारण,

११. संतोष विनायकराव आंबेकर,
वय ६७ वर्ष, धंदा - राजकारण,

१२. सुनिल जगदेव तायडे,
वय ५४ वर्ष, धंदा - राजकारण,

१३. गौतम मार्तंड मोरे,
वय ४४ वर्ष, धंदा - राजकारण,
क्र. १ रा. चिखली,
क्र. २ ते १३ रा. बुलडाणा,
ता. व जि. बुलडाणा ..... **आरोपी**

**गुन्हा :-** भारतीय दंड विधान कलम १४३, ३३६, ४२७, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे.

---

अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. मो. बशीर
आरोपींतर्फे विधीज्ञ व्ही.एन. नन्हई

---

## न्या य नि र्ण य

**(घोषीत दि. २०/०४/२०२६)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, ३३६, ४२७, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ नुसार खटला चालविण्यात येत आहे.

**अभियोग पक्षाचे कथन –**

२. फिर्यादी पोलिस कॉन्स्टेबल उमेश भास्कर घुबे यांनी पोलिसस्टेशन बुलडाणा शहर येथे फिर्याद दिली की, तो दि. ३०.०७.२०२३ रोजी दुपारी २.३० वाजताचे दरम्यान आठवडी बाजार बुलडाणा येथे पेट्रोलिंग करीत होता त्यावेळी त्याला माहिती मिळाली की, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते जयस्तंभ चौक, बुलडाणा येथे संभाजी भिडे यांचे निषेधार्थ आंदोलन करणार आहेत. त्यानंतर तो व त्याचे सोबत पो.उप.नि. पवार, पो.ना. सुनिल किनगे, पो.कॉ. टेकाळे असे जयस्तंभ चौक येथे गेले, तेव्हा तेथे सर्व आरोपी व इतर आठ ते दहा कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते महात्मा गांधी यांचे फलक घेऊन होते व 'मनोहर भिडे च करायचं काय खाली मुंडकं वर पाय, मनोहर भिडे यांचा निषेध असो' अशा घोषणा करत होते. आरोपी क्र. १३ गौतम मोरे याने बुलडाणा ते मलकापुर जाणारी एस.टी. बस क्र. एमएच ४० एन ९८९१ या बसला दगड मारुन बसचे काच फोडले व बसचे नुकसान केले. तसेच मा. जिल्हाधिकारी साहेब बुलडाणा

यांचे आदेश क्र. गृहविभाग कक्ष ४–२/कावी/३१८/२०२३ दिनांक २७.०७.२०२३ अन्वये दिनांक ३०.०७.२०२३ च्या सकाळी ६.०० वाजता पासून ते दि. १३.०८.२०२३ च्या रात्री १२.०० वाजतापर्यंत संपूर्ण बुलडाणा जिल्हयामध्ये मुंबई पोलिस कायदा, १९५१ चे कलम ३७(१)(३) म.पो.का. सुरु असताना आरोपींनी सदर आदेशाचे उल्लंघन करुन सदर आंदोलनाकरिता कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता गैरकायद्याची मंडळी जमवून बसला दगड मारुन बसचे नुकसान केले. त्यानंतर फिर्यादीने बुलडाणा शहर पोलिसस्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादवरुन आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, ३३६, ४२७, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये गुन्हा नोंद क्र. ६६८/२०२३ दाखल झाला. तपासिक अंमलदार पो.उप.नि. रमेश कानडजे यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. तपास टिपण नोंदवले. तपासाअंती आरोपींविरुद्ध वरील कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, ३३६, ४२७, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३ आणि महाराष्ट्र पोलीस

कायदा, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपींना सदर दोषारोपातील मजकूर वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा दोषी ठेवण्याइतपत आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन अनुक्रमे नि. ५१ ते ६३ अन्वये नोंदविण्यात आले आहे. त्यांनी गुन्हा केल्याबाबतचे नाकारले आहे.

६. माझ्या विचाराधीन उद्भवलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| <u>अ.नं.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, दिनांक ३०/०७/२०२३ रोजी दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास आरोपींनी समान उदीष्ट साधण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमा करुन मोर्चा काढला व ते त्या मोर्चाचे घटक होते व त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम १४३ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उदीष्ट साधण्यासाठी अविचारी किंवा निष्काळजी कृत्यांद्वारे इतरांचे जीवन किंवा वैयक्तिक सुरक्षा धोक्यात आणण्याचा प्रयत्न केला व त्यायोगे | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३३६ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | |
| ३. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपी गौतम मोरे याने व इतर आरोपींच्या सोबत समान उदीष्ट साधण्यासाठी एस.टी. बस क्रमांक एमएच ४० एन ९८९१ ला दगडमारुन बसचे जाणूनबुजून नुकसान केले व त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ४२७ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला तसेच सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ४. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन समान उद्दीष्ट साधण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचा भंग केला व त्यायोगे महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ५. | आदेश काय ? | **आरोपी यांना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

७. सरकारी अभियोक्ता श्री. मो.बशीर मो.नासीर व आरोपीतर्फे वकील श्री. व्ही.एन. नन्हई यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे दाखल केलेली

कागदपत्रे तपासली.

८.		अभियोग पक्षाने एकुण सहा साक्षीदार तपासले त्यामध्ये सा.क्र. १ फिर्यादी उमेश भास्कर घुबे यास नि.क्र. ३९ वर, सा.क्र. २ पंच साक्षीदार संजय महादेव अहीर यास नि.क्र. ४१ वर, सा.क्र. ३ सुनिल पुंजाजी किनगे यास नि.क्र. ४४ वर, सा.क्र. ४ उत्तम रामजी लवंगे यास नि.क्र. ४५ वर, सा.क्र. ५ रुपलाल जयसिंग ब्राम्हणे यास नि.क्र. ४६, सा.क्र. ६ रमेश पांडुरंग कानळजे यास नि.क्र. ४८ वर तपासले.

९.		अभियोग पक्षाने आरोपीवर कलम १४३, ३३६, ४२७ भादवी, कलम ३ सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा, कलम ३७(१)(३) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम खालील गुन्हा सिध्द करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने मी सदर कलम पुराव्याचे पुनरुच्चारण करणेकामी खालील प्रमाणे पुनरुत्पादन करीत आहे.

Section 143 of the Indian Penal Code (IPC) addresses the punishment for being a member of an unlawful assembly, which is an assembly of five or more persons with a common illegal object. The punishment for this offense is imprisonment of either description for a term up to six months, a fine, or both.

Section 336 of the Indian Penal Code (IPC) penalizes any act so rashly or negligently as to endanger human life or the personal safety others, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to three months or with fine which may extend to two hundred and fifty rupees, or with both.

Section 427 of the Indian Penal Code (IPC) punishes commits mischief and thereby causes loss or damage to the amount of fifty rupees or upwards, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to two years, or with fine, or with both.

Section 3 of the Maharashtra Prevention of Defencement of Property Act, 1995 penalizes the defacement of property in public view with imprisonment up to three months, a fine up to two thousand, or both. It makes defacing, disfiguring, or damaging public or private property visible to the public a criminal offence, aiming to prevent graffiti, illegal posters, and unauthorized signs.

"Section 135 makes it an offense to disobey or fail to comply with orders, directions, or notifications issued by the State Government or a police officer under Section 37 of the Act."

"The offense is considered cognizable if the conditions set by the law are met, allowing a police officer to arrest without a warrant and start prosecution. If these conditions are not met, it becomes a non-cognizable offense."

"या कलमाचा वापर सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी लागू केलेले नियम आणि कायदे लागू करण्यासाठी केला जातो, जसे की वाहतूक, सभा किंवा कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर क्रियाकलापांवर निर्बंध."

<u>**मुद्दे क्र.१ ते ४ बाबत**</u> :-

१०. मुद्दे क्र. १ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्यावरील विश्लेषणाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी त्यावर एकत्रितपणे चर्चा करीत आहे.

११. अभियोगपक्षाच्या वतीने आरोपींवर कलम १४३, ३३६, ४२७ भादवी, कलम ३ सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा, कलम ३७(१)(३) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम नुसार गुन्हा सिध्द करणेकामी एकुण ६ साक्षीदार तपासले. सा.क्र. १ उमेश भास्कर घुबे यांस नि.क्र. ३९ वर तपासले. तो बुलडाणा पोलिसस्टेशन येथे गोपनिय विभागामध्ये पोलिस कॉन्स्टेबल आहे. त्याने घटनेबाबत पोलिसठाणे बुलडाणा शहर येथे फिर्याद दिली. घटनेच्या दिवशी तो व त्याच्यासोबत इतर पोलिस कर्मचारी आठवडी बाजारामध्ये अंदाजे २.३० वाजता पेट्रोलिंग करीत होते तेव्हा त्याला माहिती मिळाली की, भारतिय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे काही कार्यकर्ते जयस्तंभ चौक येथे आंदोलन करणार आहेत. तेव्हा

तो व इतर पोलिस कर्मचारी जयस्तंभ चौक येथे गेले, त्याठिकाणी राष्ट्रपीता महात्मा गांधी यांच्याबाबत श्री संभाजी भिडे यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याच्या निषेधार्थ सर्व आरोपी व त्यांच्या सोबत १० ते ११ इसम जयस्तंभ चौक येथे कॉंग्रेस पक्षाचे झेंडे हातात घेऊन त्यांनी 'संभाजी भिडे यांचे करायचे काय खाली मुंडकं वर पाय, बिजेपी सरकारचा निषेध असो' अशा घोषणाबाजी केल्या. तसेच आरोपी गौतम मोरे याने बुलडाणा–मलकापुर जाणारी बस क्र. एमएच ४० एन ९८९१ ला रस्त्याच्या कडेचा दगड उचलून बस वाहकाच्या दिशेने काचला दगड मारला. घटनेच्या वेळी मा. जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदीचा आदेश होता तरीसुध्दा आरोपींनी विना परवाना व गैरकायद्याची मंडळी जमविली होती. त्यानंतर त्याने पोलीसस्टेशन येथे फिर्याद दाखल केली. फिर्यादला नि.क्र. ४० व छापिल फिर्यादला नि.क्र. ४१ देण्यात आले.

१२. सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की, तो बुलडाणा शहर पो.स्टे. येथे सन २०२१ पासून कार्यरत आहे त्यामुळे त्याला तेथील सर्व ठिकाणची माहिती आहे. बुलडाणा येथील जयस्तंभ चौक हे वर्दळीचे ठिकाण आहे. त्या ठिकाणावरुन त्याला कुठल्याही त्रयस्त इसमाची तोंडी अथवा लेखी तक्रार आली नाही. त्याला सर्व आरोपींची नावे माहिती नाही. त्याने उलटतपासात मान्य केले की, घटनेच्या वेळी राज्यात व केंद्रात भाजपाचे सरकार होते. सदर गुन्हयाची

एफ.आय.आर. तीन तास उशीराने दाखल करण्यात आली. त्याने मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची प्रत व्यापक प्रमाणात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे बघीतले नव्हते. सदर साक्षीदाराने राजकीय दबावापोटी गुन्हयाची फिर्याद दिली असल्याचे दिसून येते.

१३. अभियोग पक्षाने सा.क्र. २ संजय महादेव अहीर यास नि.क्र. ४१ वर तपासले. तो घटनास्थळ पंच आहे. त्याने सरतपासात कथन केले की, पोलिसाने दि. ३१.०७.२०२३ रोजी घटनास्थळ पंचनामा करणेकामी बोलाविले नव्हते. घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही आहे. त्याची सही पोलिसस्टेशन येथे घेण्यात आली होती. त्याच्या देखत बुलडाणा येथील जयस्तंभ चौक येथे कोणताही पंचनामा झाला नाही. सदर साक्षीदाराला फितूर घोषीत करण्यात आले. अभियोग पक्षातर्फे उलटतपासात अभियोग पक्षाला सहकार्य होईल असे कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे त्याच्या साक्षीला कायदेशीर महत्व देता येत नाही.

१४. अभियोग पक्षाने सा.क्र. ३ सुनिल पुंजाजी किनगे यास नि.क्र. ४४ वर तपासले. तो बुलडाणा पोलिसस्टेशन येथे ना.पो.कॉ. म्हणून नेमणूकीस होता. दि. ३०.०७.२०२३ रोजी त्याला पोलिस निरीक्षक काटकर यांनी जयस्तंभ चौक येथे डयुटी करीता ताबडतो जाण्याचे आदेश दिले. त्यानंतर तो, त्याच्यासोबत

पो.कॉ. संदिप टेकाळे, पो.उप.नि. दिलीप पवार, पो.कॉ. उमेश घुबे हे जयस्तंभ चौक येथे बंदोबस्ताकामी गेले. जयस्तंभ चौक येथे काँग्रेस पक्षाचे माजी आमदार राहुल बोंद्रे, माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ, सुनिल तायडे, शाम उमाळकर, गौतम मोरे व इतर ७ ते ८ कार्यकर्ते जमा झाले होते. तसेच आरोपी हे महात्मा गांधीचा फोटो हातात घेऊन संभाजी भिडे यांनी केलेल्या कथनाबाबत निषेध करीत होते. आंदोलन सुरु असताना त्यावेळी बुलडाणा बसस्थानकाकडून एक एसटी महामंडळाची बस बुलडाणा ते मलकापुर जाणारी बस क्र. एमएच ४० एन ९८९१ ला आरोपी गौतम मोरे याने एक दगड वाहकाच्याबाजूने समोरील काचेवर मारला व काच फुटला. आरोपींना आंदोलन करण्याची परवानगी नव्हती तसेच आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून मा. जिल्हाधिकारी यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले.

१५. सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की, तो बुलडाणा शहर पो.स्टे. येथे सन २०२२ पासून कार्यरत आहे त्यामुळे त्याला तेथील सर्व ठिकाणची माहिती आहे. बुलडाणा येथील जयस्तंभ चौक हे वर्दळीचे ठिकाण आहे. त्या ठिकाणावरुन त्याला कुठल्याही त्रयस्त इसमाची तोंडी अथवा लेखी तक्रार आली नाही. त्याला सर्व आरोपींची नावे माहिती नाही. त्याने उलटतपासात मान्य केले की, घटनेच्या वेळी राज्यात व केंद्रात भाजपाचे सरकार होते. सदर गुन्हयाची

एफ.आय.आर. तीन तास उशीराने दाखल करण्यात आली. त्याने मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची प्रत व्यापक प्रमाणात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे बघीतले नव्हते. सदर साक्षीदाराने राजकीय दबावापोटी गुन्ह्याची फिर्याद दिली असल्याचे दिसून येते.

१६. अभियोग पक्षाने सा.क्र. ४ उत्तम रामजी लवंगे यास नि.क्र. ४५ वर तपासले. सदर साक्षीदार हा एस.टी. बस कंडेक्टर आहे. त्याने त्याच्या सरतपासात कथन केले की, घटना दि. ३०.०७.२०२३ रोजी २.३० वाजता जयस्तंभ चौक, बुलडाणा येथे घडली. त्या दिवशी तो बुलडाणा ते मलकापुर येथील बसवर कंडेक्टर म्हणून कार्यरत असताना त्याला काच फुटण्यासारखा आवाज आला. त्यामुळे चालकाने एस.टी. बस एकदम जागेवर थांबवली. त्याला एस.टी. बसचा क्रमांक आठवत नाही. त्याला वाहक बाजूचा समोरील काच फुटलेला दिसला व एसटी बसच्या आतमध्ये दगड पडलेला दिसला. एस.टी. बससमोर पोलिस कर्मचारी, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, शाम उमाळकर, संजय राठोड यांच्यासह अंदाजे १३ लोक उभे होते. एस.टी. बसला दगड मारल्यामुळे काच फुटलेला होता. बसला दगड मारणारा इसम कॉंग्रेस पक्षाचा कार्यकर्ता होता.

१७. सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की, तो एस.टी. डेपो

मलकापुर येथे सन २०२१ पासून कार्यरत आहे. तो सर्व आरोपींना ओळखू शकत नाही. त्याने मान्य केले की, आरोपी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आहेत. घटनेच्यावेळी महाराष्ट्रात भाजपाचे सरकार होते. तो बसच्या मागील आसनावर बसला होता त्यामुळे दगड कोणत्या दिशेने आला व दगड कोणी फेकला हे त्याला माहीत नाही.

१८. अभियोग पक्षाने सा.क्र. ५ रुपलाल जयसिंग ब्राम्हणे यास नि.क्र. ४६ वर तपासले. सदर साक्षीदार मलकापुर बस डेपो येथे चालक आहे. दि. ३०.०७.२०२३ रोजी सदर साक्षीदार एस.टी. बस बुलडाणावरुन मलकापुरकडे चालक म्हणून जात होता आणि वाहक उत्तम लवंगे होता. दुपारी २.३० वाजता जयस्तंभ चौक, बुलडाणा येथे कॉंग्रेसचे कार्यकर्ते आंदोलन करीत होते त्यातील एका इसमाने त्याच्या बसच्या समोरील काचेवर वाहकच्या बाजुने दगड मारला त्यामुळे समोरील वाहक बाजूचे काच फुटले. पोलिसांनी त्याला सदरची एस.टी. बस पोलिसस्टेशन बुलडाणा शहर येथे नेण्यास सांगितली. दगड मारणा—या इसमाचे नाव मोरे असे होते. आंदोलनकर्तेमध्ये हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे व इतर सात ते आठ लोक हजर होते.

१९. सदर आरोपीने उलटतपासात मान्य केले की, तो एस.टी. डेपो मलकापुर येथे १० ते ११ वर्षापासून कार्यरत आहे. त्याने दि. ३०.०७.२०२३ रोजी

एस.टी. बस मलकापुरवरुन १२.३० च्या दरम्यान नेली व बुलडाणा येथे २.१५ वाजता पोहोचवली. त्याला एसटी बसचे लॉकशीट दाखविण्यात आले. बसच्या लॉकशीटला नि.क्र. ४६ देण्यात आले. सदर लॉकशीटवर बुलडाणा डेपोतून बस सुटण्याची वेळी २.४५ मिनीटे आहे. जयस्तंभचौक हे वर्दळीचे ठिकाण होते. बस चालविताना तो गाडी चालविण्यात मग्न होता. एस.टी. बसला गाडीच्या समोरुन दगड मारला गेला. दगड मारणा-या व्यक्तीचे नाव त्याला माहीत नाही. दगड मारणा-याचे नाव मोरे होते असे त्याला पोलिसांनी सांगितले होते. तो सर्व आरोपींना ओळखत नाही. तो सर्व आरोपींची नावे सांगू शकत नाही. त्याने पुढे मान्य केले की, आरोपी हे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे आरोपी आहेत. घटनेच्या वेळी महाराष्ट्रात भाजपाचे सरकार होते.

२०. अभियोग पक्षाने सा.क्र. ६ रमेश पांडुरंग कानळजे यास नि.क्र. ४८ वर तपासले. सदर साक्षीदार तपासीक अमलदार आहे. दि. ३०.०७.२०२३ रोजी तो बुलडाणा शहर पोलिसस्टेशन येथे ना.पो.कॉ. म्हणुन नेमणुकीस होतो. सदर दिवशी त्याला अप.क्र. ६६८/२०२३, कलम १४३, ३३६, ४२७ भादवी सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम, कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक कायद्याचा तपास मिळाला. केस डायरीमध्ये त्याला एफआयआर आणि फिर्यादीचा रिपोर्ट इत्यादी मिळाले. त्याने दोन पंचांना घेऊन घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळ हे बुलडाणा येथील जयस्तंभ चौक आहे. घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ४९ वर आहे. त्याने साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासादरम्यान त्याने एस.टी. वाहनाचे कागदपत्र प्राप्त

करुन दोषारोपपत्रामध्ये समाविष्ठ केले. तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाची छायांकीत प्रत प्राप्त करुन दोषारोपपत्रामध्ये समाविष्ठ केली. सबळ पुरावा मिळून आल्याने त्याने आरोपीतांविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयामध्ये दाखल केले. आरोपींनी जयस्तंभ चौक बुलडाणा येथे संभाजी बिडे यांनी महात्मागांधी यांच्या बाबत केलेल्या वादग्रस्त विधानाच्या निषेधार्थ गैर कायद्याची मंडळी जमवून घोषणाबाजी करुन आंदोलन केले व आरोपी गौतम मार्तंडे याने एसटी बसच्या समोरील बाजुस दगड मारुन काच फोडुन नुकसान केले असे त्याच्या तपासामध्ये निष्पन्न झाले.

२१. सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की, त्याने सदर प्रकरणाच्या तपासामध्ये पोलिसां व्यतिरीक्त इतर साक्षीदारास तपासले नाही. जयस्तंभ चौक हे वर्दळीचे ठिकाण आहे. घटनास्थळावरील कोणतेही साक्षीदार तपासले नाही. बसला मारलेला दगड त्याने जप्त केला नाही. बसची फुटलेली काच जप्त केली नाही. त्याने एस.टी. बसमधील प्रवाशांचे जबाब नोंदविले नाही. एफआयआर चार तास उशीराने दाखल केला त्याचे कारण नमुद केले नाही. त्याने उलटतपासात पुढे मान्य केले की, २०२३ ला भाजपाचे सरकार होते. आरोपी हे कॉग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आहेत. त्याला सर्व आरोपींची नावे माहीत नाही. त्याने सदरचा तपास राजकीय दबावापोटी केल्याचे दिसून येते.

२२. वरील चर्चेप्रमाणे व कागदपत्राची पाहणी केल्यावरुन असे दिसुन येते की, वरील आरोपींविरुध्द फिर्याद देण्यात आली की, ते भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस

पक्षाचे कार्यकर्ते जयस्तंभ चौक, बुलडाणा येथे संभाजी भिडे यांचे निषेधार्थ आंदोलन करीत होते. आरोपी जयस्तंभ चौक येथे कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते महात्मा गांधी यांचे फलक घेऊन होते व 'मनोहर भिडे च करायचं काय खाली मुंडकं वर पाय, मनोहर भिडे यांचा निषेध असो' अशा घोषणा करीत होते. आरोपी क्र. १३ गौतम मोरे याने बुलडाणा ते मलकापुर जाणारी एस.टी. बस क्र. एमएच ४० एन ९८९१ या बसला दगड मारुन बसचे काच फोडले व बसचे नुकसान केले. तसेच जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे आदेश संपूर्ण बुलडाणा जिल्हयामध्ये मुंबई पोलिस कायदा १९५१ चे कलम ३७(१)(३) मपोका सुरु असताना आरोपींनी सदर आदेशाचे उल्लंघन करुन सदर आंदोलनाकरिता कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता गैरकायद्याची मंडळी जमवून बसला दगड मारुन बसचे नुकसान केले.

२३. फिर्यादी व साक्षीदारांच्या साक्षीप्रमाणे आरोपींनी वेगवेगळया ठिकाणी मोर्चे काढले व भाषणबाजी केली. परंतु, प्रत्येक ठिकाणचे व घटनास्थळाचे पंचनामे करण्यात आले नाही. अभियोग पक्षाने स्वतंत्र असा साक्षीदार तपासलेला नाही. बसमधील प्रवासांपैकी एकाही इसमाला तपासण्यात आले नाही. दोन्ही बाजूंच्या वाहतुकीला अडथळा झाला होता व सदर नारेबाजीमुळे सार्वजनिक ठिकाणी शांतता भंग करण्यात आली त्याबद्दल कोणीही इसमाने पोलिसस्टेशन येथे तक्रार दाखल केली नाही किंवा कोणत्या इसमाला अडथळा केला असे

सरतपासात आले नाही. तसेच आरोपींनी आंदोलन केले त्याचे पोलिसांमार्फत मोबाईलमध्ये फोटो किंवा व्हीडीओ काढण्यात आले नाही.

२४. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्या महाराष्ट्र पोलिस कायदयाचे कलम ३७(१)(३) च्या आदेशाचा भंग केल्याचे आरोप आहे. परंतु त्या आदेशाची प्रत दोषारोपपत्रामध्ये दाखल नाही. अशा परिस्थीतीत सदरील आदेश जारी होता किंवा नाही याचा पुरावा प्रकरणात उपलब्ध नाही. सबब माझे असे मत आहे की, प्रस्तुतच्या गुन्हयातील अभियोग पक्षाने कोणतेही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासले नाही. सदर आरोपी यांनी बेकायदेशीर जमाव करुन मोर्चा काढला व मोर्चामध्ये भाषणे केली व अशोभणीय घटना घडली हे अभिलेखावर आले नाही. सबब, सदर आरोपींनी घटनास्थळी शांततेचा भंग केला किंवा कोणतेही असे कृत्य केले ज्यामध्ये कोणाच्या जिवीतास नुकसान होईल असे कृत्य केले हे सिध्द करण्यात आले नाही.

२५. साक्षीदार क्र. ४ उत्तम लवंगे हा बसचा कंडक्टर आहे. त्याने सरतपासात कथन केले की, बसचे काच फुटल्याचे अवाज आले. त्याने उलटतपासात मान्य केले की, सर्व आरोपीला तो ओळखू शकत नाही. सदर काच दगडाने फोडले. सदर दगड बसमध्ये पडला. परंतु, दगड जप्त करण्यात आले नाही. सबब, सदर साक्षीदाराने आरोपी क्र. १३ ला दगड मारताना बघीतले नाही

त्यामुळे सदर आरोपीने बसवर दगड मारला हे सिध्द होत नाही.

२६. साक्षीदार क्र. ५ रुपलाल ब्राम्हणे बसचा चालक आहे. उलटतपासात त्याने मान्य कले की, दगडाने काच फुटले परंतु काच जप्त करण्यात आले नाही. सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की, तो बस चालविण्यातमध्ये मग्न होता. त्याच्या बसला दगड मारणा–या व्यक्तीचे नाव त्याला सांगता आले नाही. त्याने सरतपासात दगडमारणा–या व्यक्तीचे नाव मोरे सांगितले. परंतु त्याचे जबाबात नाव नमुद नाही. सबब, सदर साक्षीदाराच्या साक्षीत सुधारणा दिसून येते. त्यामुळे त्याच्यासाक्षीस शंका निर्माण होते व त्याची साक्ष विश्वासार्ह आहे असे दिसून येते नाही.

२७. अभियोग पक्षातर्फे आरोपी क्र. १३ गौतम मार्तंड मोरे याने मोर्चादरम्यान एस.टी. बस क्र. एमएच ४० एन ९८९१ बर दगड फेकून सदर बसचे काच फोडले. परंतु, फिर्यादी साक्षीदार उमेश भास्कर घुबे याने उलटतपासात मान्य केले की, घटनेचे वेळी खुप लोकांची गर्दी होती. त्यामुळे सर्व आरोपींना सदर साक्षीदार पाहू शकला नाही. सदर साक्षीदाराला सर्व आरोपींचे नाव सांगता येत नव्हते असे उलटतपासात त्याने मान्य केले. या व्यतिरीक्त फिर्याद गुन्हा क्र. ६६८/२०२३ ची पाहणी केल्यावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत खटल्यातील एकूण १ ते १३ आरोपींचे नाव आहे. परंतु, सदर आरोपीं व्यतिरीक्त इतर ८ ते १०

इसम होते. परंतु, त्यांना आरोपी करण्यात आले नाही. ठराविक सदर आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले . सबब, सदर आरोपींनी सदर खटल्यात गुन्हे केले हे सिध्द होत नाही. तसेच, सदर आरोपींपैकी आरोपी क्र. १३ ने वरील क्रमांकाच्या बसला दगड मारुन काच फोडले हे सिध्द केले नाही. तसेच अभियोग पक्षातर्फे सदर एस.टी. बसचे काच फोडल्याचे पंचनामे सिध्द करण्यात आले नाही. घटनास्थळ पंच फितुर घोषीत करण्यात आले. त्याने अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. बसचे काच फोडल्याबाबतचे फोटो सुध्दा अभिलेखावर दाखल करुन सिध्द करण्यात आले नाही. तसेच फुटलेला काच व दगड सुध्दा जप्त करुन न्यायालयात सिध्द करण्यात आले नाही. बसचे काच फोडले व रुपये २५०००/– नुकसानाचे हिशोब कसे करण्यात आले. याचे स्पष्टीकरण अभियोग पक्षाने दिले नाही. सबब, आरोपींविरुध्द अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द कलम १४३, ३३६ व ४२७ भादवी, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३ सिध्द करण्यात आले नाही.

२८. याव्यतिरीक्त घटनेबाबतचे जयस्तंभ चौकचे सिसीटीव्ही, मोबाईलमधील चित्रीकरण व इतर दाखल करण्यात आले नाही. फिर्याद ३ तास उशीराने देण्यात आले. सबब, सदर फिर्याद विचार पुर्वक देण्यात आली असे दिसून येते.

२९. साक्षीदार क्र. १, २, ३ व ६ पोलिस साक्षीदार आहे. त्यांनी मान्य केले की, आरोपी कॉँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आहे व घटनेच्या वेळी महाराष्ट्रात भाजपाची सत्ता होती. सबब, सदर फिर्याद केवळ राजकीय दबावाखाली देण्यात आली असे दिसून येते. सदर साक्षीदार घटनेच्या वेळी बंदोबस्ताकामी हजर होते. परंतु, सदर पोलिस साक्षीदाराने मोबाईलमध्ये चित्रीकरण केले नाही. कोणतेही इसमाने तक्रार दिली नाही. असे कथन करण्यात आले की, आरोपीचे हातात फलक होते परंतु ते जप्त करण्यात आले नाही. घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यात आला नाही.

३०. वरील कायद्याचे अवलोकन केल्यावर असे दिसुन येते की, आरोपीला लोकसेवकाने काढण्यात आलेल्या आदेशाची सुचना व माहिती इ. द्यायला पाहिजे परंतु प्रस्तुतच्या खटल्यात आरोपींना अशी नोटीस व सुचना देण्यात आली असे अभिलेखावर आले नाही. जेव्हा एखादी व्यक्ती सार्वजनिक सेवकाने जारी केलेला, ज्याचे पालन करणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे असा आदेश जाणूनबुजून मोडतो, परंतु जिल्हा अधिकारी बुलडाणा यांनी कशाचे पालन करण्याचे आदेश दिले होते याचा पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आला नाही. त्यामुळे माझे असे मत आहे की, अभियोग पक्षाने १४३ भा.द.वी व १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम खालील गुन्हा सिध्द केले नाही. त्यामुळे मुद्दा

क्र. १ ते ४ चे निष्कर्ष मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ०५ करिता.</u>**

३१. प्रस्तुत प्रकरणामध्ये कलम १४३, ३३६, ४२७ भा.द.वी., कलम ३ सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा, महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम (१)(३), १३५ अधिनियम १९५१ अन्वये दोषारोप आरोपींविरुध्द संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. त्यामुळे आरोपी क्र. १ ते १३ निर्दोष म्हणून मुक्त करण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र. ५ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) आरोपी क्र.१ राहुल सिध्दीविनायक बोंद्रे, आरोपी क्र.२ शाम मोतीराम उमाळकर, आरोपी क्र.३ हर्षवर्धन वसंतराव सपकाळ, आरोपी क्र.४ संजय भगवान राठोड, आरोपी क्र.५ लक्ष्मण जानुजी घुमरे, आरोपी क्र.६ प्रविण रविंद्र सुरडकर, आरोपी क्र. ७ शे. अमीन शे. बिराम, आरोपी क्र. ८ बंडु सुरेश काळवाघे, आरोपी क्र. ९ रवि प्रल्हादराव पाटील, आरोपी क्र.१० दत्ता शंकर काकस, आरोपी क्र. ११ संतोष विनायकराव आंबेकर,आरोपी क्र. १२ सुनिल जगदेव तायडे, आरोपी क्र. १३ गौतम मार्तंड मोरे यांना भारतीय दंड विधान कलम १४३, ३३६, ४२७, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण कायदा कलम ३ आणि महाराष्ट्र पोलीस

कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यांत येत आहेत.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३) आरोपींनी कलम ४३६(अ) फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे रु. ६,०००/- ची जमानत द्यावी.

**(न्यायनिर्णय खुले न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2026.04.20 18:21:47 +0530

ठिकाणः चिखली **(आय.ए.वाय.ए. खान)**

दिनांकः- २०/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | G.V. Nimje<br>Stenographer Grade III |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Chikhli. |
| Date | : | 20/04/2026 |
| Signed by P. O. on | : | 20/04/2026 |
| Uploaded on | : | 20/04/2026 |